रे.मु.नं. २५५/२०१६ मधील नि.२१ वरील आदेश

प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज त्यांचेविरूध्द झालेला उलटतपास नाही हा आदेश रद्द करून उलटतपास घेण्याची परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२ प्रतिवादी यांच्या कथनानुसार प्रतिवादी क्र. १ व २ हे वयोवृध्द असून त्यात ते नेहमी आजारी असतात. प्रतिवादी क्र.२ यास अर्धांगवायुचा आजार असल्याने हालचाल करता येत नाही. प्रतिवादी क्र.१ यास सांधेदूखीचा आजार असल्याने त्यास हालचाल करता येत नाही. प्रतिवादी क्र. ३ हा कामधंदयानिमीत्त परगावी गेलेला होता. तसेच त्याचे व्याही कॅन्सर या रोगाने आजारी असल्याने त्यांना घेवून तो दवाखान्यात गेला असल्याने व तेथेच थांबल्याने न्यायालयात हजर होवून प्रतिवादी यांना त्यांच्या वकीलांना उलटतपासासाठी माहीती देता आली नाही. त्यामूळे उलटतपास नाही हा आदेश झालेला आहे. त्यांची उलटतपास घ ेण्याची तयारी आहे. त्यांना न्यायाच्या दृष्टीने परवानगी देणे गरजेचे आहे. अन्यथा त्यांचेवर अन्याय होणार आहे. दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्याकरीता व सत्यपरीस्थिती न्यायालयासमोर येणेकरीता सदर अर्ज मंजूर होणे गरजेचे आहे. सबब प्रस्तूत अर्ज दाखल केला आहे.

३ वादी यांनी अर्जास हरकत घेवून कथन केले की दि. १०.५.२०१६ रोजी प्रतिवादींना समन्स मिळाले होते. त्यांनी मुदतीत कैफियत दिली नसल्याने विनाकैफियत चौकशीचे आदेश होवून वादीने दि.३०.१.२०१७ रोजी त्यांचे शपथपत्र दिल्यानंतर प्रतिवादींनी दि. २७. २.२०१७ रोजी विनाकैफियत आदेश रद्द होण्याचा अर्ज दिला.तो खर्चावर मंजूर करण्यात आल्यानंतर दि.३.८.२०१८ रोजी वादीने परत शपथपत्र दाखल केल्यावर उलटतपास नाहीचा आदेश झालेला आहे. त्यानंतर पुढील तारीख प्रतिवादी हजर झालेले नाहीत. वादीने दि. २६.२.२०१९ रोजी पुरावा संपलेबाबत पुरसिस दिलेली आहे. सध्या प्रकरण प्रतिवादीच्या पुराव्यावर आहे. या प्रकरणात दिसून येते की केवळ प्रकरण लांबण्याकरीता सदरचे अर्ज दिले आहेत. अर्जातील कारणे संयूक्तीक नाहीत. कैफियत यापूर्वीच दिलेली आहे. सबब अर्ज रद्द होण्याची विनंती वादीने केलेली आहे. वैकल्पीकरीत्या वादीने अर्ज मंजूर झाल्यास रू १०,०००/— खर्च मिळण्याची विनंती केली आहे.

४. सदरचे प्रकरण हे वादीने वाटप होवून मिळकतीचा पृथककब्जा मिळण्याच्या विनंतीने केलेला आहे. याकामी दावा मिळकत ही वडीलोपार्जीत आहे अथवा नाही तसेच वादी मागणीप्रमाणे वाटप होवून मिळण्यास पात्र आहे अथवा नाही असे महत्वपूर्ण मुद्दे

काढण्यात आले आहेत. नि.१९ पाहता सदरचा उलटतपास नाही हा आदेश दि.५.१०. २०१८ रोजी व नि. २१ वरील उलटतपास नाही आदेश हा दि.२१.३.२०१९ रोजी झाल्यानंतर दि. २५.३.२०१९ रोजी प्रस्तूत अर्ज दाखल केलेला आहे. परंतू प्रतिवादींनी यापूर्वी वादी कथन करतात त्याप्रमाणे कैफियत दाखल करण्यास प्रलंब केलेला आहे. परंतू दाव्याची परीस्थिती व वादीची मागणी, दाव्याचे स्वरूप आणि एकंदर परीस्थितीचा विचार करता न्यायाच्यादृष्टीने व दावा गुणदोषावर निकाली करण्यासाठी माइयामते अर्ज मंजूर करणे गरजेचे आहे. त्याकरीता वादीस खर्च देता येवू शकेल. सबब खालील आदेश.

## <u>आदेश</u>

१. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादी क्र. १ यांना रू. ४००/— व वादी क्र. २ यांना रू ४००/— खर्च देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांचेविरूध्द झालेला नि.१९ व २१ वरील उलटतपास नाहीचा आदेश वरील अटीची पुर्तता केल्यावर रद्द ठरेल.

३. प्रतिवादी यांनी वादींना पुढील तारखेपर्यत प्रस्तूत अर्जाचा खर्च देणे बंधनकारक राहील.

दि.२२.०४.२०१९ ३ रे सह दिवाणी न्यायाधीश,क स्तर,बार्शी

## Certificate

I affirm that, the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | R.H.Lasane. |
| Court | : | 3rd JtCJJD & JMFC, Barshi. |
| Date: | : | 22/4/2019 |
| Judgment/Order signed by the presiding officer | : : | 22/4/2019 |
| Judgment/Order uploaded on | : : | 24/4/2019 |